SATHI
SEED AUTHENTICATION, TRACEABILITY & HOLISTIC INVENTORY

सत्यमेव जयते

॥ शाश्वत शेती - समृद्ध शेतकरी ॥

# साथी पोर्टल
## (SATHI PORTAL)



शेतकऱ्यांच्या मेहनतीचे सोनं करण्यासाठी योग्य बियाणे आवश्यक आहे.
योग्य बियाण्याची खात्री आता साथी पोर्टलच देणार आहे.

एनआईसी National Informatics Centre

## ❊ प्रस्तावना ❊

शेतकऱ्यांना वेळेवर, गुणवत्तापूर्ण आणि खात्रीशीर बियाणे मिळणे हे अन्नसुरक्षेसाठी आणि कृषी उत्पादनक्षमतेसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. उत्तम गुणवत्तेच्या जनुकीय दृष्ट्या सुधारित बियाणांमुळे पीक उत्पादनात २० % पर्यंत वाढ होऊ शकते. परंतु बहुतेक वेळी बनावट, कालबाह्य आणि अनधिकृत बियाण्यांचा पुरवठा झाल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत असते. या समस्येवर कायमस्वरूपी उपाय म्हणून भारत सरकारच्या कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाने राष्ट्रीय माहिती विज्ञान केंद्राच्या (NIC) सहकार्याने Seed Authentication, Traceability and Holistic Inventory म्हणजेच साथी पोर्टल (SATHI Portal) विकसित केले आहे.

साथी पोर्टल केवळ माहिती व्यवस्थापनासाठी नसून शेतकऱ्यांपासून ते शासनापर्यंत सर्व घटकांना जोडणारे, पारदर्शकता वाढवणारे आणि बियाण्यांच्या गुणवत्तेचे रक्षण करणारे एक सशक्त व्यासपीठ आहे. साध्या शब्दांत सांगायचे झाले तर साथी पोर्टल हे एक डिजिटल आरसा आहे, ज्यामध्ये बियाण्याचा प्रवास स्पष्टपणे दिसतो. हे पोर्टल बियाणांच्या संपूर्ण प्रवासाची नोंद ठेवते.

**उत्पादन → प्रक्रिया → साठवणूक → वितरण → विक्री**

साथी प्रणाली निर्मित QR कोडमुळे बियाण्याच्या उत्पादनाचा स्वतंत्र इतिहास शेतकऱ्याला सहज तपासता येतो. यामुळे ट्रेसिबिलिटी, पारदर्शकता, गुणवत्ता नियंत्रण आणि कायदेशीर पालन सुनिश्चित होते.

## साथी पोर्टलची गरज का भासली ?

आपल्या देशात बियाण्यांचा वापर फार मोठ्या प्रमाणावर होतो. विविध प्रकारचे तृणधान्ये, कडधान्ये कापूस, सोयाबीन, भाजीपाला अशा प्रत्येक पिकासाठी दरवर्षी प्रचंड प्रमाणावर बियाण्यांची देवाण–घेवाण होते. पण या मोठ्या व्यवहारामध्ये पारदर्शकतेचा अभाव होता. अनेकदा शेतकऱ्यांना कोणते बियाणे अधिकृत कंपनीचे आहे आणि कोणते बनावट आहे, हे कळत नसे. बियाण्यांची पिशवी घेतली तरी त्यात अपेक्षित गुणधर्म असतीलच याची हमी नसायची. परिणामी उत्पादन घटायचे व शेतकऱ्याचा खर्च वाया जायचा. शासनालाही बियाण्यांच्या उपलब्धतेची अचूक आकडेवारी मिळत नसे. एका जिल्ह्यात बियाण्यांचा तुटवडा असताना दुसऱ्या जिल्ह्यात साठा पडून राहायचा. या सगळ्या अडचणींवर उपाय म्हणून साथी पोर्टल निर्माण झाले.



## साथी पोर्टल : उद्दिष्टे व महत्त्व




## बियाणे उत्पादक व वितरकांसाठी साथी पोर्टलची उपयुक्तता

- पारदर्शकता आणि शेतकऱ्यांमध्ये विश्वासार्हता वाढवते
- बनावट, कालबाह्य व अनधिकृत बियाण्यांवर नियंत्रण
- व्यवसाय सुलभता आणि व्यवस्थापन
- कायदेशीर बाबींचे पालन करणे सुलभ
- खर्चात व वेळेत बचत
- विक्री आणि वितरणावरील नियंत्रण
- डेटा बँक तयार होते
- वितरण साखळीचा ट्रॅक ठेऊन नियोजन शक्य
- शेतकऱ्यांच्या तक्रारींवर तात्काळ उपाययोजना शक्य
- एकाच प्लॅटफॉर्मवर सर्व व्यवहार
- राज्य व राष्ट्रीय स्तरावर नेटवर्किंग
- संस्थेचा ब्रँड व व्यवसाय दोन्ही वाढण्यास मदत

## साथी पोर्टलची अंमलबजावणी खालीलप्रमाणे टप्प्याटप्प्याने करण्यात आलेली आहे

**खरीप २०२३**
महाराष्ट्र राज्य बीज प्रमाणिकरण यंत्रणेमार्फत फेज १ कार्यवाही सुरु
फेज १– पैदासकार, पायाभूत व प्रमाणित बिजोत्पादन

**खरीप २०२४**
उत्पादित झालेल्या प्रमाणित बियाण्याचे वितरण/विक्री साथी पोर्टलवर सुरू

**मार्च २०२५**
सत्यप्रत बियाणे साथी पोर्टलवर घेणेबाबतची कार्यप्रणाली विकसित

**एप्रिल २०२५**
पथदर्शी प्रकल्पातील संस्थांची साथी प्रणालीवरील प्रायोगिक चाचणी यशस्वी

**२५ एप्रिल २०२५**
सत्यप्रत बियाणे साथी पोर्टलवर कार्यान्वित करण्यास शासन निर्णयाद्वारे मान्यता

## साथी पोर्टलची फेज २ कार्यपद्धती

बियाणे विक्रेत्यांनी साथी पोर्टलवर लॉगिन करावे
https://seedtrace.gov.in/

↓

वरील संकेतस्थळावर प्रवेश करून 'महाराष्ट्र राज्य' निवडावे. त्यानंतर लॉगिन आयडी व पासवर्ड प्रविष्ट करून, कॅप्चा कोड टाकावा व लॉगिन करावे

↓

प्रथमच लॉगिन केल्यानंतर, वापरकर्त्यांनी सर्वप्रथम आपली प्रोफाईल अद्ययावत (Update) करावी

↓

पोर्टलच्या उजव्या कोपऱ्यात "Seedtrace" व "Inventory" या दोन टॅब उपलब्ध आहेत. त्यापैकी वितरण/विक्रीसाठी "Inventory" टॅब निवडावा

↓

पोर्टलच्या वरील भागातील "Location" टॅब निवडावा

## साथी फेज २ "Inventory Module" मध्ये बियाणे विक्रेत्यांसाठी उपलब्ध असलेल्या सुविधा

- डॅशबोर्ड (Dashboard)
- पासवर्ड अद्ययावत करणे (Change Password)
- बियाणे साठा व्यवस्थापन (Stock Management)
- अहवाल (Reports)

## डॅशबोर्ड (Dashboard)

डॅशबोर्डवर उपलब्ध सुविधा

- खराब झालेला साठा (Damaged Stock)
- उपलब्ध साठा (Stock Available)
- स्वीकृतीसाठी आलेला साठा (Stock to Receive)
- सूचना (Alerts/ Notifications)
- परत केलेला साठा (Returned Stock)

## ✻ बिल निर्मितीची प्रक्रिया अकार्यान्वित करणे –

ज्या वापरकर्त्यांकडून बिलिंगसाठी स्वत:चे सॉफ्टवेअर वापरले जाते आणि जे साथी पोर्टलवरून बिल तयार करू इच्छित नाहीत, ते प्रोफाइल संयोजनेतील Generate Bill टॅबवर क्लिक करून बिल निर्मिती अकार्यान्वित (Disable) करू शकतात.

## SATHI ⟷ उद्योग संसाधन नियोजन (ERP) प्रणाली एकत्रीकरण :-

✻ साथी पोर्टल (Phase-II) अंतर्गत बियाणे उत्पादक व विक्रेते यांना त्यांच्या वापरातील उद्योग संसाधन नियोजन (ERP) प्रणाली (उदा. Tally) यांचे साथी पोर्टलसोबत API च्या माध्यमातून एकत्रीकरण (Integration) करून देण्याची सुविधा उपलब्ध.

✻ बियाणे उत्पादक व विक्रेते यांचेकरीता यासाठीची मानक कार्यपद्धती (SoP) निच्छित केलेली आहे.

## बियाणे साठा व्यवस्थापन (Stock Management) अंतर्गत उपलब्ध सुविधा

| | |
|---|---|
| बियाणे साठा स्वीकृती (Receive Stock) | ※ उत्पादकाने/विक्रेत्याने वापरकर्त्यास विक्री केलेले बियाणे स्वीकृत करणे |
| बियाणे विक्री (Sale) | ※ बियाणांची विक्री करणे<br>※ विक्रेते/शासकीय संस्था/शेतकरी या तीन प्रकारच्या खरेदीदारांना विक्री करणेची सुविधा उपलब्ध |
| बियाणे साठा परतावा (Return Stock) | ※ खराब, कालबाह्य, न विकलेला, विक्रीसाठी स्थगिती दिलेला बियाणे साठा विक्रेत्यास परत करण्यासाठी ही सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे.<br>※ वापरकर्त्यांना आलेला बियाणे साठा परत करायचा असेल तर तो दोन प्रकारे परत करता येईल.<br>१. उत्पादकाला परत करणे (Return to Producer)<br>२. विक्रेत्यास परत करणे (Return to Seller) |
| परत आलेल्या साठ्याची स्वीकृती (Receive returned stock) | ※ खरेदीदारांना बियाणे विक्री करण्यात आले आहे, त्यांनी कोणत्याही कारणास्तव ते बियाणे परत केल्यास, त्या परत आलेल्या बियाण्यांची स्वीकृती करणे |
| शेतकऱ्यांकडून परत आलेले बियाणे (Return from Farmer) | ※ शेतकऱ्याकडून परत आलेल्या बियाण्यांची नोंद करणे |
| डिलिव्हरी चलन तयार करणे (Generate Delivery challan) | ※ विक्री केलेल्या बियाण्यांचे डिलिव्हरी चलन तयार करणे |
| बिल पाहणे / प्रिंट करणे (View/Print Bill) | ※ बिल पाहणे / प्रिंट करणेसाठी |
| व्हाउचर पाहणे/प्रिंट करणे (View/Print Return Voucher) | ※ परत केलेल्या बियाणे साठ्याशी संबंधित व्हाउचर पाहणे व प्रिंट करणे |
| व्हाउचर रद्द करणे (Cancel voucher) | ※ खरेदीदारास विक्री केलेल्या बियाण्यांची ऑर्डर मागे घेण्यासाठी.<br>※ संबंधित खरेदीदाराने ऑर्डर स्वीकारली नसेल तेव्हाच ती ऑर्डर मागे (revert) घेता येईल |
| फॉर्म 'डी' (Form D) | ※ बियाणे (नियंत्रण) आदेश, १९८३, कलम १८ मध्ये निर्देशित केल्यानुसार प्रत्येक बियाणे विक्रेत्याने त्याच्या व्यवसायाशी संबंधित मागील महिन्याचे मासिक विवरणपत्र फॉर्म 'डी' मध्ये प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत परवाना प्राधिकरणाकडे सादर करण्याकरिता सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे |

### उत्पादकाने विक्रेत्यास बियाणे विक्री केल्यानंतर अनुसरावयाची प्रक्रिया –

### अ) बियाणे साठा स्वीकृती (Receive Stock)

बियाणे साठा व्यवस्थापन (Stock Management) मधील – 'Receive Stock' टॅब निवडावा

↓

"Transfer Voucher Number" समोरील टेक्स्ट फील्डमध्ये योग्य "Voucher Number" प्रविष्ट करून बियाणे साठा स्वीकृत करावा.

## ब) बियाणे विक्री (Sale) –

* पोर्टलवर खरेदीदारांचे तीन प्रकार उपलब्ध आहेत –

(१) विक्रेते (२) शासकीय संस्था (३) शेतकरी

* विक्रेते / शासकीय संस्थेस बियाणे विक्रीची कार्यपद्धती

राज्य – जिल्हा– खरेदीदार निवडावा.

↓

खरेदीदाराचे तपशील, जसे की परवाना क्रमांक आणि पत्ता, पोर्टलवर आपोआप दर्शविले जातात.

↓

"Stock Selection" मध्ये जाऊन पीक, वाण, प्रमाणिकरण प्रकार, लॉट नंबर आणि पॅकिंगचा आकार निवडावा.

↓

पोर्टलवर उपलब्ध बॅग (Available Bags) व त्यांची किमत दर्शविली जाते व या उपलब्ध बॅगांमधून विक्रीसाठी आवश्यक बॅगची संख्या (Required Bags) निवडावी व समोरील '+' या टॅबवर क्लिक करावे.

↓

पीक, वाण, लॉट नंबर आणि पॅकिंगचा आकार निवडल्यावर, निवडलेल्या बॅगांची संख्या व प्रती बॅग किंमत यांचा Cart पोर्टलवर तयार केला जातो.

↓

Cart मध्ये "Action" टॅबची सुविधा उपलब्ध आहे. या टॅबच्या माध्यमातून निवडलेल्या Cart मध्ये सुधारणा (Edit) किंवा रद्द करणे (Delete) ही प्रक्रिया करता येते.

↓

Cart अंतिम झाल्यानंतर "Sale Stock" या टॅबवर क्लिक करावे

↓

खरेदीदारास काही सवलत द्यायची असल्यास, "Want to add discount on this order" हा पर्याय निवडून Flat किंवा Percentage या दोन पद्धतीने सवलत लागू करता येईल

↓

Confirm या टॅबवर क्लिक केल्यानंतर Order Summary दर्शविली जाईल यामध्ये "Confirm Sale" या टॅबवर क्लिक करावे

↓

Stock Sold Successfully हा उपसंदेश येऊन Sale Stock ही विंडो दर्शविली जाऊन यामध्ये View Bill व Delivery Challan या टॅबवर क्लिक करून बिल/डिलिव्हरी चलन पाहणे/ प्रिंट करण्याची सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे.

* शेतकऱ्यांना बियाणे विक्रीची कार्यपद्धती

शेतकऱ्याचा फार्मर आय डी नमूद करावा

↓

फार्मर आय डी उपलब्ध नसेल तर शेतकऱ्याचे पूर्ण नाव व मोबाईल नंबर नमूद करावे

↓


साठा निवड (Stock Selection) व बियाणे विक्रीसाठी विक्रेते/शासकीय संस्थेच्या बियाणे विक्री कार्यपद्धतीचा अवलंब करून शेतकऱ्यांना बियाणे विक्री करता येईल.

## विक्रेत्यांचे लॉगिन वर उपलब्ध असलेले अहवाल (Reports)

| विक्री अहवाल (Sale Report) | फॉर्म 'डी' Form D | साठा उपलब्धता (Stock availability) |
|---|---|---|
| विक्री केलेल्या बियाणांचा अहवाल पाहण्यासाठी तसेच सदर अहवाल एक्सेलमध्ये एक्सपोर्ट करण्यासाठी | परवाना प्राधिकरणाकडे सादर केलेला अहवाल पाहण्यासाठी | विक्रीसाठी उपलब्ध असलेल्या बियाणे साठ्याची माहिती पाहण्यासाठी |

## बियाण्यांचे प्रकार

बियाण्यांच्या गुणवत्तेच्या सातत्यपूर्ण जतनासाठी व वाणशुद्धतेसाठी बियाण्यांचे उत्पादन विविध स्तरात तयार केले जातात. हे स्तर खालीलप्रमाणे आहेत –




| अ. क्र. | बियाण्याचा प्रकार | मूळ स्रोत | तपासणी/प्रमाणिकरण | खूणचिठ्ठी (टॅग) | प्रमुख उपयोग |
|---|---|---|---|---|---|
| १ | केंद्रक | – | संशोधन संस्था /विद्यापीठ | – | पैदासकार बियाणे तयार करणे |
| २ | पैदासकार | केंद्रक बियाणे | संशोधन संस्था /विद्यापीठ | पिवळा | पायाभूत बियाणे तयार करणे |
| ३ | पायाभूत | पैदासकार बियाणे | प्रमाणिकरण यंत्रणा | पांढरा | प्रमाणित बियाणे तयार करणे |
| ४ | प्रमाणित | पायाभूत बियाणे | प्रमाणिकरण यंत्रणा | निळा | शेतकऱ्यांसाठी |
| ५ | सत्यप्रत | प्रमाणित बियाणे/खाजगी बियाणे उत्पादकांचे संशोधित वाण | स्वयंघोषणा (Self Certification) | हिरवा | शेतकऱ्यांसाठी |

### साथी पोर्टल तांत्रिक सहाय्य

**प्रशिक्षण**
राज्य/जिल्हा/तालुका

**Helpdesk Tab**
वापरकर्त्यांच्या लॉगीनवर सुविधा उपलब्ध

**दूरध्वनीद्वारे संपर्क/व्हॉट्सअॅप ग्रुप्स**
SATHI II COMMUNITY, Seed Companies MH

साथी प्रकल्प अंमलबजावणी कक्ष
(कृषी आयुक्तालय, पुणे)

## अधिक माहितीसाठी संपर्क साधावा

संचालक, निविष्ठा व गुणवत्ता नियंत्रण विभाग, मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला,
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे– ४११००१
Email Id: sathimh25@gmail.com
कृषी विभाग संकेतस्थळ – https://krishi.maharashtra.gov.in/